# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ३०/०३/२०२६

## मा. विशेष महासभा

**मा. महासभा सुचना क्र. ४**

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ------------------------------------------------------------
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. विशेष महासभा शुक्रवार दि. १७/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात सुचना क्र. ०४ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.

(दिनेश कैलास कानगुडे)
महापालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. विशेष महासभा दि. १७/०४/२०२६, सभा सुचना क्र. ०४ विषयपत्रिका**

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| २५ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ नियम २५(२)(३) अन्वये परिवहन समितीवर १२ (बारा) सदस्यांची नेमणूक करणे. |

महानगरपालिका सचिव कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- ३० मार्च, २०२६

(दिनेश कैलास कानगुडे)
महापालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत :- निवडणूक कार्यक्रम

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सचिव विभाग

**शुक्रवार दिनांक १७/०४/२०२६ रोजी होणाऱ्या महासभेत परिवहन समितीवर बारा व्यक्तींची नियुक्ती करणेसाठी निवडणुक कार्यक्रम**

| वार व दिनांक | वेळ | तपशिल |
|---|---|---|
| सोमवार<br>दि. १३/०४/२०२६ | सकाळी ११.०० ते<br>दुपारी ०१.०० वाजेपर्यंत | परिवहन समितीवर सदस्य पदाच्या नेमणुकीकरीता विहित नमुन्यातील नामनिर्देशन पत्र महापालिका सचिव यांचेकडे त्यांच्या कार्यालयात दाखल करणे. |
| | दुपारी ०३.३० वाजता | प्राप्त नामनिर्देशन पत्रांची यादी प्रसिध्द करणे. |
| बुधवार<br>दि. १५/०४/२०२६ | सकाळी ११.०० वाजता | दाखल झालेल्या नामनिर्देशन पत्रांची छाननी महापालिका सचिव यांचे कार्यालयात करणे. |
| | छाननी पूर्ण झाल्यानंतर लगेच | वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे. |
| गुरुवार<br>दि. १६/०४/२०२६ | सकाळी ११.०० ते<br>दुपारी ०१.०० वाजेपर्यंत | उमेदवारी मागे घेणे. |
| | दुपारी ०१.३० वाजता | निवडणुक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करणे. |
| शुक्रवार<br>दि. १७/०४/२०२६ | सकाळी ११.००<br>वाजलेपासून पुढे सभेचे कामकाज संपेपर्यंत | मा. महासभेत परिवहन समितीवर बारा सदस्यांच्या नियुक्तीकरीता निवडणुकीची आवश्यकता भासल्यास गुप्त मतदान घेण्यांत येईल व मतदान संपताच मतमोजणीस प्रारंभ होईल. |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २५(२) व (३) मधील अर्हता लक्षात घेऊन नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यांत येणार आहे. तरी नामनिर्देशन पत्रासोबत आवश्यक ती प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक आहे. अन्यथा नामनिर्देशन फेटाळले जाईल याची सुचक, अनुमोदक व उमेदवार यांनी कृपया नोंद घ्यावी.

१) विहीत नमुन्यातील नामनिर्देशन पत्र सोमवार दि. ०६/०४/२०२६ ते बुधवार दि. ०८/०४/२०२६ पर्यंत कार्यालयीन कामाचे दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत महापालिका सचिव कार्यालयात उपलब्ध होतील.

२) नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या वेळी सुचक, अनुमोदक व उमेदवार यांनी समक्ष हजर राहणे आवश्यक आहे. त्यांचे समक्ष नामनिर्देशन पत्र दाखल करुन घेणेत येईल. तसेच नामनिर्देशन पत्र छाननीच्या दिवशी व वेळी सूचक, अनुमोदक व उमेदवार यांनी समक्ष हजर रहावे.

३) उमेदवाराचे संपूर्ण नाव, निवासाचा पत्ता, विधानसभा मतदार संघाचा क्रमांक, विधानसभा अद्यावत मतदार यादी भाग क्रमांक व अनुक्रमांकाची प्रमाणित प्रत सोबत जोडावी.

४) उमेदवार हा मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मतदार असावा.

५) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २५(२) नुसार परिवहन समिती सदस्य पदासाठी, ज्या व्यक्तीस प्रशासनाचा किंवा परिवहनाचा अनुभव असेल व अभियांत्रिकी, औद्योगिक, वाणिज्यिक, वित्तीय किंवा कामगार विषयक बाबतीत ज्यांची क्षमता दिसून आली असेल याबाबतची प्रमाणित कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

६) पालिका सदस्य म्हणून अर्हता धारण करणेसाठी आवश्यक असलेली प्रतिज्ञापत्रे परिवहन समिती सदस्य पदाच्या नामनिर्देशन पत्रासोबत जोडणे आवश्यक राहील.

**(दिनेश कैलास कानगुडे)**
**महापालिका सचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव कार्यालय**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**दिनांक :- ३० मार्च, २०२६**